## वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचे कार्यालय

विषय :- वार्षिक योजना सन २००८-०९ राज्य स्तरीय योजनांचे मंजूर नियतव्ययानुसार चालू/नविन बाब प्रस्ताव सादर करणे बाबत.
क्रमांक कक्ष-३(१)/खर्च/योजना/ ९६
चंद्रपूर, दिनांक १२.५.०८

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
नागपूर.

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक कक्ष-२२(६)/योजना/२१८, दिनांक १७/४/२००८.

****

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सन २००८-०९ करीता निसर्ग पर्यटन इको-टुरिझम रुपये ८०.०० लाखाचा चालू बाब प्रस्ताव यासोबत सादर करण्यांत येत आहे.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.

<u>विवरण पत्र -१</u>

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
राज्य योजना अंतर्गत योजना
सन २००८-०९ करिता चालू बाब प्रस्ताव (राज्य पुरस्कृत) निसर्ग पर्यटनचा विकास

| अ.क्र. | बाबीचा तपशील | परिमाण | दर | सन २००८-०९ करिता प्रस्तावित रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | पांगडी पर्यटन संकुल इथे डॉरमीटरी चे बांधकाम | १ | रु. २०.०० लाख प्रती | २०.०० लाख |
| २ | मोहर्ली येथील चंद्रपूर वन विभागा कडून हस्तांतरीत जूने वनविश्राम गृहाचे नवीनीकरण व कक्ष वाढविणे | १ | रु. १०.०० लाख प्रती | १०.०० लाख |
| ३ | कोलारा येथील पयर्टन सकुंलचे चेनलिंक कूंपण करणे | ६०० मी. | रु. १५०० (प्रति मीटर) | ९.०० लाख |
| ४ | कोलारा पर्यटन संकुलात हॉलीडे होम इमारतीचे बांधकाम व साजसज्जा | १ नग | रु. १०.०० लाख प्रती | १०.०० |
| ५ | हिरडीनाला ते हौंडी फोडी लाईन रस्त्याचे मजबूतीकरण कोळसा परिक्षेत्र | २.३६० कि.मी. | रु. २.१० लाख प्रती कि.मी. | ५.०० लाख |
| ६ | कोळसा वनविश्रामगृह ते कोळसा शिव पंर्यत रस्त्याचे मजबूतीकरण कोळसा परिक्षेत्र | १.४३० कि.मी. | २.१० प्रती कि. | ३.०० लाख |
| ७ | वर्ष २००७-०८ या वर्षी करण्यात आलेले पांगडी ते आडीमोडी हिलॉक रस्त्याचे मजबूती करण्याचे राहिलेले शिल्लक काम ( २.३६५. कि.मी. (-) १.८२५ कि.मी.) ०.५४० कि.मी.पुर्ण करणे. | ०.५४० | रु. २.१० लाख प्रती कि.मी. | १.१५ लाख |
| | तसेच कोलारा डोनी रस्त्याचे झालेले कामाचे वाटप करवायाची शिल्लक रक्कम | उक्त | -- | ०.२५ लाख<br>१.४० लाख |
| ८ | काळाआंबा ते मानुसखिंडी रस्त्याचे मजबूतीकरण ताडोबा परिक्षेत्र ४ पुला सहित. | ३.०० कि.मी. | रु. ७.०० लाख प्रती कि.मी. | २१.०० लाख |
| ९ | प्रसिध्दी साहित्य तयार करणे परिरक्षण करणे. | उक्त | -- | ००.६० लाख |
| | एकूण | | | ८०.०० लाख |

(रुपये अंशी लाख फक्त.)

वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.

# ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर

## निसर्ग पर्यटन विकास योजना प्रस्ताव सन २००८-०९

| | | |
|---|---|---|
| राज्य | :- | महाराष्ट्र |
| विभाग | :- | महसूल व वनविभाग |
| खात्याचे मंत्री | :- | मा. श्री. बबनराव पाचपुते |
| प्रधान शिर्ष | :- | २४०६ वनिकरण व वन्यजीवन |
| उपशिर्ष | :- | ०१ वानिकी |
| गौण शिर्ष | :- | (०२)(७५) निसर्ग पर्यटन राज्य (२४०६-२२९.५) |
| योजनेचे नांव | :- | वनक्षेत्रात निसर्ग पर्यटनाचा विकास ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प |
| योजना सूरु झाल्याचे वर्ष | :- | २००६-०७ |
| योजनेची तरतूद २००८-०९ | :- | ८० लक्ष |

चालू बाब प्रस्ताव सन २००८-०९ साठी अंर्तभूत बाबी.

### १) पांगडी पर्यटन संकुल इथे डॉरमीटरीचे बांधकाम.

राज्य व केंद्र शासनाच्या धोरणानुसार संरक्षित क्षेत्राच्या आंतील पर्यटकाचे थांबण्याची व्यवस्था न वाढविता ते संरक्षित क्षेत्राच्या बाहेर विकसित करावयाची आहे. त्यानुसार वर्ष २००६-०७ मध्ये मोहर्ली इथे व वर्ष २००७-०८ मध्ये कोलारा येथे डॉरमीटरी बांधण्यात आली असून कोळसा परिक्षेत्रातील पंगडी प्रवेश द्वारच्या बाहेर उपलब्ध शासकिय जमीनीवर पर्यटन संकुल उभारण्याचे सुरु आहे. विद्यार्थी व मध्यम आर्थिक वर्गाला स्वस्तत्र राहण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने पांगडी पर्यटन संकुलात डॉरमीटरी इमारत बांधकाम साठी २०.०० लाख रुपयाची आवश्यकता असल्याने तरतूद करण्यात आलेली आहे.

### २) मोहर्ली येथील जूने विश्रामगृहाचे नवीनीकरण.

वरील धोरणानुसार ताडोबा येथील पर्यटन संकुल १/४/२००८ पासून बंद करण्यात आलेले आहे. प्रकल्पाला भेट देणारे वरिष्ठ अधिकाऱ्यांना/पर्यटकांना थाबण्यासाठी सुयोग्य अशी व्यवस्था मोहर्ली येथे नसल्याने चंद्रपूर वन विभागाचे जूने वन विश्रामगृह ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाला हस्तातरीत करुन घेण्याची प्रक्रिया सूरु असून सदर विश्रामगृह चे नवीनीकरण करुन सद्या असलेले २ कक्ष ऐवजी २ अतिरिक्त कक्ष तयार करणे आवश्यक असल्याने त्यांचे बांधकाम व नवीकरणासाठी रुपये १०.०० लाखाची आवश्यकता आहे तरी सदर तरतूद करण्यात आलेली आहे.

### ३) कोलारा येथील पर्यटन संकुल चेनलिंक कूंपण करणे.

कोलारा येथे पर्यटन संकुल विकसित करण्यात येत असून सौंदर्य व सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून सदर संपुर्ण संकुल चेनलिंक फेन्सीग करुन ग्रील गेट बसविणे जरुरी आहे. कोलारा इथे ६०० मीटर लांबीची फेन्सीग तयार करावयाची असून सी.एस.आर दरानुसार १५०० रुपये प्रती मीटर नुसार रुपये ९.०० लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

### ४) कोलारा पर्यटन संकुलात हॉलीडे होमचे बांधकाम.

ताडोबा येथील पर्यटकांना थांबण्याचे हॉलीडे होम १/४/२००८ पासून बंद करण्यात आले असून मध्यवर्गीय पर्यटकांना थांबण्यासाठी इतरत्र उपलब्ध सोय कमी पडत असल्याने व्याघ्र प्रकल्पाचे बाहेर कोलारा येथील पर्यटन संकुलात एक हॉलीडे होम ची इमारत बांधणे आवश्यक झालेले आहे. त्यासाठी १०.०० लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

हिरडीनाला ते हांडीफोडी रस्ता मजबूतीकरण

कोळसा परिक्षेत्रातील पांगडी प्रवेश द्वार पासून कोळसा इथे येण्यासाठी असलेला मार्ग सद्यास्थितीत माती रस्ता असून पावसाळयात खूपच खराब होतो सदर रस्त्या पैकी आवश्यक असे भाग निवडून त्याला मजबूतीकरण करण्याचे योजिले असून त्यासाठी सदर हिरडीनाला ते हांडीफोडी भाग २.३७० कि.मी. मजबूतीकरणासाठी प्रस्तावित असून २.१० लाख रुपये प्रती कि.मी.नुसार रुपये ५.०० लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

६) कोळसा विश्रामगृह ते कोळसा गावाची शिव पर्यंत रस्त्याचे मजबूती करण.

कोळसा परिक्षेत्रातील पांगडी कोळसा हा रस्ता मुख्य पर्यटक रस्ता असून काही ठिकाणी दलदलीचा भाग असल्याने वाहतूकीला अडचण होते म्हणून अशा भाग निवडून १.४३० कि.मी. लांबीचे मजबूतीकरण करण्यासाठी रुपये २.१० लाख प्रती कि.मी. नुसार रुपये ३.०० लाखाची तरतूद करण्यात येत आहे.

७) पांगडी ते आडीमोडी हिलॉक रस्त्याचे मजबूतीकरण. (भाग काम)

वर्ष २००७-०८ मध्ये सदर रस्त्याची एकूण लांबी २.३६५ कि.मी. पैकी उपलब्ध तरतूदी मधून १.८२५ कि.मी. चे काम पुर्ण झाले असून अंदाजपत्रकानुसार ०.५४० कि.मी. चे काम शिल्लक आहे ते काम पुर्ण करणे आवश्यक असल्याने रुपये १.१५ लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.तसेच मागील वर्षी कोळसा डोनी रस्त्याचे केलेले कामाचे रुपये ०.२५ लाखाचे पेमेंट करणे शिल्लक आहे त्याची तरतुद करण्यात येत आहे.

८) काळा आंबा ते भानुसखिंडी रस्ता मजबूतीकरण.

ताडोबा परिक्षेत्रात काळा आंबा पानस्थळा पासून भानुसखिंडी कडे जाण्यासाठी ३ कि.मी. चे अंतर असून त्या ३ कि.मी. मार्गावर पर्यटकाचे आकर्षण उदा. दवना, भानुसखिंडी हे ठिकाण स्थित आहे. परंतु सदर रस्ता अरुंद असल्याने पर्यटकांना तिथे जाण्यासाठी अडचण होते तसेच संरक्षण कर्मचाऱ्यांना पावसाळयात संरक्षण कुटीवर जाण्यासाठी अडचण होते म्हणून सदर रस्ता (त्यावरील ३ रपटे सह) मजबूतीकरण करणे जरुरी आहे त्यासाठी रपटयाची किमंत धरुन रुपये ७.०० लाख प्रती कि.मी. प्रमाणे रुपये २१.०० लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

९) प्रसिध्दी साहित्य तयार करणे व परिरक्षण करणे.

सद्या उपलब्ध प्रसिध्दी साहित्य वेळोवेळी अद्यावत करावे लागते व त्याचे परिरक्षण करावे लागते त्यासाठी रुपये ०.६० लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.